वर्ष ३४ | जुलै २०२६ | अंक ७ | ४०३

पॉप्युलर प्रकाशन

प्रिय रसिक

आपल्यासाठी आणि मित्रांसाठी

३०१, महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई ४०० ०२६, दूरध्वनी : ०२२ - २३५३०३०३
Email: info@popularprakashan.com / Website: www.popularprakashan.com
/popularprakashan popularprakashan @PopularPrakashn

अंकविशेष

मार्गी आणि देशी

— डॉ. मीनाक्षी पाटील

तथापि

कवितासंग्रहावर परिसंवाद

— प्रा. डॉ. समिता जाधव

खांद्यावरचे स्टार्स

एक हृद्य पत्र...

— प्रा. अरुण कांबळे बनपुरीकर



दास्तान-ए-तुर्की

मन:शांती

अहमद हमदी तानपिनार

अनुवाद : सविता दामले

मार्गी आणि देशी

— डॉ. मीनाक्षी पाटील

‘आत्मचरित्रातले काल्पनिक क्षण’ या आपल्या कादंबरीत ज्यांनी आजचं जगणं तीन खंडांत मांडताना तिसऱ्या खंडात थेट काळाची मिती ओलांडून नववं, दहावं आणि एकविसावं शतक एकमेकांत नांदताना दाखवलंय त्या श्रीधर तिळवे यांच्या बहुआयामी प्रतिभेचं अत्यंत प्रभावी दर्शन त्यांच्या ‘मार्गी आणि देशी’ या नव्या ग्रंथात घडतं.

श्रीधर तिळवे यांनी कविता, कथा, कादंबरी, नाटक, समीक्षा, सिनेमा, जाहिरातक्षेत्र अशा विविध क्षेत्रांत भरीव काम केलं असून त्यांच्या साऱ्या लेखनातून त्यांच्या आंतरविद्याशाखीय ज्ञानाची प्रचिती येते. प्रस्तुत ग्रंथात १९९३ सालापासून ते अगदी अलीकडील काळापर्यंत वेगवेगळ्या वर्तमानपत्रांत तसेच नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांचं संकलन आहे. खरं तर **मार्गी आणि देशी** हा बृहद्ग्रंथ म्हणजे श्रीधर तिळवे यांनी साहित्यकलेविषयी केलेलं एक प्रदीर्घ असं सौंदर्यविधानच आहे. या संपूर्ण ग्रंथात एकूण ३६ लेख असून यात - 'कलाकृती, निर्मिक आणि रूप : निर्मितिमीमांसा', 'मार्गी आणि देशी', 'पहिली नवता,' 'दुसरी नवता', 'तिसरी नवता : साठोत्तरी', 'तिसरी देशी नवता : ऐंश्युत्तरी', 'चौथी नवता / पहिली जालता' — अशा एकंदर सात विभागांचा समावेश आहे.

पहिल्या विभागात ‘कलाकृतीच्या स्वरूपशोधात’, ‘कलाकृतीचे स्वरूप’, ‘रूप : बांधकाम, पुनर्बांधकाम, जोडकाम, तोडकाम व विनाशकाम,’ ‘कलाकृतीच्या सृजनतेच्या पद्धती आणि संबंधता : दोन नोंदी’, ‘कवितेच्या निर्मितीच्या शोधात’ आणि ‘निर्मितिमीमांसा : संहितानिर्मिती’ असे कलात्मक निर्मितीप्रक्रियेचा वेध घेणारे सहा लेख आहेत.

या बृहद्ग्रंथातील दुसऱ्या विभागाचं शीर्षक **मार्गी आणि देशी** असून त्यामध्ये पहिलाच लेख हा ‘मार्गी आणि देशी’ या संकल्पनांची मीमांसा करणारा आहे. दि. १८ फेब्रुवारी २००२ रोजी दिल्लीमध्ये झालेल्या इंग्लिशमध्ये लिहिणाऱ्या भारतीय आणि मूळ भारतीय वंशाच्या लेखकांच्या ‘ॲट होम इन वर्ल्ड’ या परिषदेच्या निमित्ताने जे प्रश्न चर्चेमध्ये आले, त्या अनुषंगाने लिहिलेला हा लेख आहे. या लेखात तिळवे म्हणतात, ‘भारतात गेली चार हजार वर्षे लेखकांचे व लेखनाचे दोन प्रकार कार्यरत आहेत. पहिला ‘देशी’

म्हणजेच आपली अभिव्यक्ती, जिला भौगोलिक व भूमिसातत्याचा आधार आहे, अशा देशी भाषेत लेखन करणारे लेखक व दुसरा 'मार्गी' म्हणजेच आपली अभिव्यक्ती, जिला भौगोलिक व भूमिसातत्याचा आधार नाही; पण ह्या देशातील मार्गावर, महामार्गावर जिला अस्तित्व आहे अशा भाषेत लेखन करणारे लेखक.' या दोन प्रकारांमध्ये कोणते लेखक येतात, याची फोडही तिळवे करतात. ते सांगतात, "पहिल्या 'देशी' या प्रकारात मराठी, गुजराती, आसामी वगैरे भाषा व त्या भाषेत लेखन करणारे लेखक आहेत. तर दुसऱ्या प्रकारात संस्कृत, फारसी, उर्दू, आणि आता हिंदुस्थानी व इंग्रजी ह्या भाषेत लेखन करणारे लेखक व त्यांचे लेखन येते." हा विचार अधिक स्पष्ट करताना तिळवे म्हणतात, 'मार्गी भाषा ह्या नेहमीच ह्या देशात आक्रमक म्हणून आलेल्या जेते लोकांच्या भाषा होत्या व त्या त्यांनी सांस्कृतिक वर्चस्वापोटी इतरांवर लादल्या. मात्र कालांतराने त्यांचे

देशीकरण होत गेले आणि त्या इथल्या संस्कृतीचा अपरिहार्य भाग झाल्या.' खरं तर भाषांच्या या प्रातिनिधीक उदाहरणातून तिळवे यांनी हजारो वर्षांपासून सुरू असलेल्या 'देशी आणि मार्गी' विचारव्यूहातील संघर्ष-संवादाचं नाट्य या संपूर्ण ग्रंथातून वेगवेगळ्या पद्धतीने उलगडून दाखवलेलं आहे. त्यामुळे या संपूर्ण ग्रंथाचा मूलाधार 'देशी आणि मार्गी' हा विचारव्यूह असल्यामुळे खरं तर या ग्रंथाचा आरंभच या प्रकरणाने व्हावयास हवा होता. जेणेकरून ग्रंथाच्या शीर्षकातील संज्ञा वाचकांसमोर उलगडल्यानंतर पुढे त्या संज्ञा-संकल्पनांचा विस्तार वाचताना वाचकांना विषयवस्तूचं आकलन अधिक सुलभ व्हायला मदत झाली असती, असं मनोमन वाटून जातं.

या संपूर्ण ग्रंथात तिळवे यांनी कविता, नाटक, कादंबरी अशा वेगवेगळ्या साहित्यप्रकारांतील मार्गी आणि देशी विचारव्यूहाविषयी स्वतःच्या सखोल चिंतनातून आकळलेली निरीक्षणं नोंदवली आहेत, प्रसंगी सविस्तर विवेचन केलं आहे. प्राचीन

भारतीय रंगभूमीसंदर्भातील त्यांनी मार्गी आणि देशी या दृष्टिकोनातून केलेलं विश्लेषण तर अत्यंत माहितीपूर्ण असून एकूणच भारतीय नाट्यपरंपरेचा खूपच सखोल वेध ते घेतात. प्राचीन नाट्यपरंपरेचा वेध घेणाऱ्या या प्रकरणाला जोडूनच खरं तर 'मराठी नाटककारांची मार्गी उसनवारी व चोरी' हे प्रकरण आलं असतं तर 'नाटक' या वाङ्मयप्रकारातील 'मार्गी आणि देशी' विचारव्यूहाचं सूत्र वाचकांना अखंडितपणे समजायला मदत झाली असती.

नाटकाविषयीच्या या दोन प्रकरणांच्या मध्ये 'भाषा, भाष्ये, भाषांतरे आणि संस्कृती' हे खूपच मौलिक माहिती देणारं एक प्रकरण आलं आहे. सदर प्रकरणात तिळवे यांनी पुन्हा भारतीय समाजात प्राचीन काळापासून चालत आलेल्या विविध संस्कृतीतील देशी भाषा व विविध आक्रमकांसोबत आलेल्या मार्गी भाषा यांच्यातील ताणेबाणे खूप सुंदर उलगडून दाखवले आहेत. अर्थात हे मांडताना तिळवे यांच्या संदर्भबहुल शैलीमुळे अनेक संज्ञा-संकल्पना वाचकांना

जणू माहीतच असतील असं गृहित धरून त्यांनी विवेचन केलं आहे. त्यामुळे हा ग्रंथ वाचताना वाचकाचाही अभ्यास म्हणून काहीएक पूर्वतयारी असणं आवश्यक आहे, असं मनोमन वाटतं. या प्रकरणातील 'वार्ता भाषांतरित करण्यापेक्षा ती सरळ इंग्रजीतून वाचणे सोपे होते' हे विधान असो किंवा 'कामशास्त्र आणि मोक्षशास्त्र यांना जी प्रतिष्ठा मिळाली ती कधीही वार्तेला मिळाली नाही' हे विधान असो, या दोन्ही विधानांत येणारी ही 'वार्ता' कोण? असा प्रश्न वाचकाच्या मनात 'वार्ता विघ्नाची' बनून आस्वादात रसविघ्न बनू शकतो. थोडक्यात वार्ता म्हणजे व्यावहारिक विद्या-तंत्रविद्या जसं कृषी, वाणिज्य इ. असं स्पष्ट म्हटलं असतं तर सर्वसामान्य वाचकाला विषय समजायला मदत होऊ शकली असती. अर्थात यामुळे वाचक काही संज्ञांचा शोध घ्यायला प्रवृत्त होईल, हा पण याचा एक चांगला परिणाम होऊ शकेल.

या प्रकरणानंतर आलेल्या 'मराठी नाटककारांची मार्गी उसनवारी व चोरी' या

प्रकरणाच्या शीर्षकातूनच तिळवे यांनी मराठीतील गाजलेल्या नाटककारांच्या नाटकावरील मार्गी म्हणजेच परकीय भाषांतील नाटकांचा प्रभाव किंवा त्यांनी त्यातून केलेली उसनवारी, चोरी आणि दरोडेखोरी असा सविस्तर ऊहापोह केला आहे. मार्गी घटकांची चोरी ही अस्सल निर्मितीसाठी उत्तेजन देण्याऐवजी अनेकदा बाधकच कशी ठरते, असा विचार मांडणारं, गाजलेल्या मराठी नाटककारांची झाडाझडती घेणारं हे प्रकरण अगदी मुळातूनच वाचावं इतकं मनोरंजक झालं आहे.

यानंतर येणाऱ्या तिसऱ्या विभागात 'पहिली नवता' या शीर्षकाखाली कुसुमाग्रज आणि राजकुमार यादव यांच्याविषयीचे प्रासंगिक लेख आले आहेत. चौथ्या विभागात 'दुसरी नवता' या शीर्षकांतर्गत आलेल्या चार लेखांतील पहिल्या लेखात व्हिटमनच्या अर्वाचीन रोमॅण्टिक कवितेविषयी आणि बॉदलेअरच्या आधुनिकतावादी कवितेविषयी विश्लेषण आहे. याच विभागातील पुढील लेखातून कृतक आंतरराष्ट्रीयवाद

जोपासणारी अपि म्हणजे अमृतमहोत्सवी पिढी, परंपराशरण पिढी, परंपरेविरुद्ध बंड करणारी पिढी यांच्या देशी आणि मार्गी जाणिवांचा लेखाजोखा त्यांनी खूप परखडपणे मांडला आहे. विंदा करंदीकर : दुसऱ्या नवतेचा समर्थ कवी आणि विलास सारंग यांच्या 'अक्षरांचा श्रम केला' या समीक्षाग्रंथावरील लेख — अशा दोन दीर्घ लेखांतून तिळवे यांनी दोघांच्याही लेखनावर सविस्तर भाष्य केले आहे.

विभाग पाच, सहा आणि सात अशा तीनही विभागांतून तिळवे यांनी तिसरी नवता व्यक्त करणारी साठोत्तरी, तिसरी देशी नवता व्यक्त करणारी ऐंश्युत्तरी आणि चौथी नवता / पहिली जालता व्यक्त करणारी नव्वदोत्तरी अशा काव्यप्रवाहांचे केलेले दीर्घ विवेचन मुळापासून वाचण्यासारखे आहे. अर्थात या बृहद्ग्रंथातील लेख वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या प्रसंगांच्या निमित्ताने लिहिलेले असले तरी त्या साऱ्या लेखनातून तिळवे यांनी मार्गी आणि देशी

विचारव्यूहाचा धागा खूप प्रभावीपणे उलगडला आहे. थोडक्यात संदर्भबहुलतेने समृद्ध असलेला हा ग्रंथ वाचकाला विचारप्रवृत्त करणारा असा आहे. या ग्रंथाचं वेगळेपण म्हणजे प्रचलित काटेकोर विद्यापीठीय समीक्षापद्धतीचा अवलंब न करता तिळवे अगदी उत्स्फूर्त शैलीत काळाच्या विशाल पटलावरील वैविध्यपूर्ण संदर्भांचे जिगसॉ पझल जोडताना अनेक विचारव्यूहांची निर्मिती, त्यांचा संवाद-संघर्ष खूप अभ्यासपूर्ण मांडणीतून उलगडून दाखवतात.

बऱ्याच वर्षांनंतर वाचकांच्या मेंदूला 'मार्गी आणि देशी' असे चांगले पौष्टीक खाद्य देणारा एक मौलिक समीक्षाग्रंथ दिल्याबद्दल मित्रवर्य श्रीधर तिळवे आणि पॉप्युलर प्रकाशनाचे मनापासून आभार आणि अभिनंदन!

मार्गी आणि देशी

श्रीधर नलिनी शांताराम तिळवे नाईक



किंमत
₹. १७५.००

येथे उपलब्ध

www.popularprakashan.com | amazon.in

Follow on us : @PopularPrakashn

सर्व विक्रेत्यांकडेही उपलब्ध!

तथापि

कवितासंग्रहावर परिसंवाद

पुण्यात ‘वाचकपीठ’चे आयोजन

जगातील जवळजवळ सर्वच भाषांच्या साहित्यविश्वात ‘कविता’ या वाङ्मय प्रकाराला सर्वाधिक मान्यता आहे. कवितेसाठी आयुष्य वाहून घेणाऱ्यांची संख्या जगभरात कमी नाही. मराठी कविताही त्याला अपवाद नाही. कवितेवर अफाट प्रेम करणारे, ती रुजवणारे, वाढवणारे यांची मोठी परंपरा मराठी कवितेत आहे. परंतु जिथे ‘वाचत राहणं’ ही गोष्टच मुळी दुर्मीळ होत चालली आहे त्या काळात कवितेच्या प्रेमापोटी काही अभियंते एकत्र येतात. त्यातील काही

कवितेसाठी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारतात आणि व्रतस्थाप्रमाणे आजच्या समाज माध्यमाच्या आहारी गेलेल्या समाजात कवितेची रुजवणूक करतात, ही गोष्ट कवितेच्या दृष्टीने अत्यंत मोलाची आहे. 'वाचकपीठ प्रतिष्ठान' हे त्याचे द्योतक आहे. प्राचार्य चंद्रकांत भोसले, भास्कर निर्मळ, मारुती सावंत, प्रिया धारुरकर, माधुरी चौधरी इ. कविताप्रेमींनी वाचकपीठ प्रतिष्ठानच्या माध्यमातून कवितेची एक मोठी चळवळ महाराष्ट्रात उभी केली आहे. समाजातील विविध घटकांना कवितेने जोडून ठेवण्याचे काम हे प्रतिष्ठान मागील सहा वर्षांपासून करीत आहे.

जून २०२० पासून ऑनलाईन स्वरूपात सुरू झालेला हा कार्यक्रम २०२३ पासून वर्षातून एकदा ऑफलाईन स्वरूपात होतो. अहमदनगर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड आणि पुणे अशा चार जिल्ह्यांच्या ठिकाणी आतापर्यंत अनुराधा पाटील, मंगेश नारायणराव काळे, प्रज्ञा दया पवार आणि दासू वैद्य यांच्या कवितासंग्रहांवर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक २६ जुलै २०२६ रोजी सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात मराठीतील प्रसिद्ध कवी दासू वैद्य यांच्या **तथापि** या काव्यसंग्रहावर परिसंवाद संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन ८८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांनी केले; तर या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी डॉ. मीनाक्षी पाटील (प्रसिद्ध कवयित्री, चित्रकार आणि सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ) या होत्या; तर किरण भावसार, डॉ. अविनाश कदम, जयश्री हरि जोशी, प्रा. राजाभाऊ भैलुमे यांनी या संग्रहावर भाष्य केले.

प्रतिभावान कवी आपल्या भाषेचा वाङ्मयीन नकाशा बदलू शकतो. प्रतिभा असणाऱ्या लोकांची दखल घेणे हे समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. ‘मराठी भाषेची प्रकृती असणाऱ्या अभंगांची दर्जेदार रचना फार थोड्या कवींनी केली, त्यात दासू वैद्य यांचे नाव आवर्जून घ्यावे लागते. त्यांच्या गांभीर्याने चाललेल्या काव्यलेखनाचा मी वाचक आणि चाहता आहे’, असे मनोगत डॉ. सदानंद मोरे यांनी उद्घाटनाप्रसंगी बोलताना केले. याप्रसंगी राजारामबापू पाटील, ललित कला अकादमीचे निमंत्रक कवी प्रदीप पाटील व अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य कवी देवीदास फुलारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. तुकाराम रोंगटे होते.

कवी दासू वैद्य यांनी आपल्या मनोगतातून काव्य लेखनामागची भूमिका आणि कवितेचा प्रवास उलगडून दाखवला. ‘इतर लेखनापेक्षा कविता मला सर्वाधिक आकर्षित करते. ज्याप्रमाणे

खार या प्राण्याला चोचीचे हाड वाढू नये यासाठी सतत काही ना काही कुरतडत राहणं अनिवार्य आहे, त्याप्रमाणे माझ्या जगण्यातला अनर्थ वाढू नये यासाठी मी कविता लिहितो. खऱ्या कवीला आतून समाधान देणारी एकमेव गोष्ट म्हणजे त्याला सुचलेली कवितेची ओळ ही आहे. प्रत्येकाचं आपलं पंढरपूर असतं, आपला पांडुरंग असतो, आपली दिंडी असते. त्याप्रमाणे चाळीस वर्षांपूर्वी दिंडी घेऊन निघालेलो मी, मला कवितेच्या पंढरपूरला जायचं आहे. अजून तरी पंढरपूरला मी पोहोचलेलो नाही आणि लवकर पोहोचायची घाईही मला नाही', अशा प्रकारच्या भावना व्यक्त करून आपल्या तीन कवितांचे सादरीकरण यावेळी कवी दासू वैद्य यांनी केले.

संग्रहावर भाष्य करताना किरण भावसार यांनी कवितेशी संवाद साधत संग्रहातील वेगवेगळ्या प्रकारच्या कविता उलगडून या संग्रहाचा पट काय आहे, हे दाखवून दिले आणि

काव्य-चर्चेसाठीची वातावरण-निर्मिती केली. त्यामुळे श्रोत्यांनाही संग्रहातील कवितेचा प्रवास घडला. कवी दासू वैद्य यांच्या आजवरच्या कवितासंग्रहांतील 'त' कार त्यांनी आपल्या भाष्यातून दाखवून दिले.

गझलकार असणाऱ्या डॉ. अविनाश कदम यांनी कवितेच्या आशयाच्या दृष्टीने कवितेतील सामर्थ्यस्थळे दाखवून दिली. तसेच 'तथापि' या संग्रहातील कवितांमधील पर्यावरण या वेगळ्या घटकाकडे श्रोत्यांचे लक्ष वेधले.

जयश्री हरि जोशी यांनी विविध अंगाने कवी दासू वैद्य यांच्या लेखनाचा प्रवास उलगडून दाखवत त्यांच्या सर्व लेखनातील दुवे एकमेकांशी कसे जुळतात, एका संग्रहातील अपूर्णता दुसऱ्या संग्रहात पूर्णत्वास कशी येते, त्यानुसार दासू वैद्य यांच्या लेखनात एक सूत्र आहे असे नमूद केले. आधुनिक माणसाचा समग्र पेच मांडणारी ही कविता स्त्रियांच्या दुःखाचा अवकाश, त्या

दुःखाची तीव्रता अतिशय आत्मीयतेने विशेष करून टिपते. कवितेच्या अंतरंगाचे पापुद्रे असणारे मुखपृष्ठ कवितेची ओळख करून देणारे आहे हे नोंदविताना—‘ही कविता म्हणजे सृजनाच्या वाटेवरची दीपमाळ असून, समाजात विविध कारणांनी विविध पद्धतीने भोग भोगणाऱ्या स्त्रिया ते त्यांच्यापेक्षा सुदैवी-सुरक्षित असणाऱ्या स्त्रिया यांच्यातील पूल बांधणारी आहे. मानवी सुखदुःखाचा व्यापार, सांस्कृतिक मूल्यांचा ऱ्हास, असहिष्णु भवताल, वंचितांचे शोषण, बाईचं जाळभाज जिणं मांडताना आजच्या काळात ढासळत चाललेल्या मानसिक पर्यावरणाकडे ही कविता लक्ष वेधते. विविध प्रतिमा, प्रतिके, रूपके यांच्या साह्याने मानवी जीवनाचे शोकात्म चित्रण सक्षम संवेदनेने या कवितेने उभे केले आहे. वैफल्याचे सुजाण भान, विषण्णता, सुबोध ओघ, विस्मयकारकता, काळा वर्तमान, अनुभवनिष्ठा, भावनिष्ठा, सामान्यांची भाषा इत्यादी वैशिष्ट्ये

असणारी ही कविता सगळ्या वयाच्या रसिकांशी संवाद साधते. उपरोधाच्या अंगाने नकारात्मकता टिपताना तिचा प्रवास सकारात्मक दिशेने होतो. अस्तित्वाचा संघर्ष मांडाव्या लागणाऱ्या काव्यपरंपरेची ही पाईक आहे. सांस्कृतिक संदर्भ, जातिवंत जिव्हाळा, उपरोध, टीकेची जिवंत धार, वाचकांसमोर निष्ठुरपणे आरसा धरणारी अशी ही कविता कोणताही अभिनवेश, अट्टाहास नसणारी, अवडंबर नसणारी अशी आहे. ती शब्दांचे सोहळे साजरे करीत नाही तर वाचकाबरोबर ‘मी’पासून ‘आम्ही’पर्यंत व्यापक होत जाऊन वाचकाचीही दृष्टी व्यापक करत जाते. आजच्या मराठी कवितेत या कवितेची जागा संवेदनशील सामाजिक कवितेची आहे. ती प्रचार किंवा पलायन करीत नाही, तर प्रश्न विचारून वाचकाला स्वतःकडे पाहायला लावते’, अशाप्रकारे दासू वैद्य यांच्या ‘तथापि’ या संग्रहाचे विशेष जयश्री जोशी यांनी नोंदवले.

चळवळीच्या अंगाने दासू वैद्य यांच्या कवितेचा परामर्ष राजाभाऊ भैलुमे यांनी घेतला.

ही कविता वर्तमानाचा कसा उभा-आडवा छेद घेते, हे त्यांनी दाखवून दिले. तुकाराम, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ यांची मानवता शिरोधार्य मानणारी ही कविता आहे. काळावर प्रभाव पाडणारी, मोहर उमटवणारी आणि वाचकावर संस्कार करणारी ही कविता 'व्यक्ती ते समाज' असा प्रवास करत रुंदावत मानवतेकडे जाणारी असल्याचे निष्कर्ष भैलुमे यांनी नोंदविले.

अध्यक्षीय समारोप करताना मीनाक्षी पाटील यांनी इतर भाष्यकारांच्या नोंदविलेल्या वैशिष्ट्यांचा आढावा घेऊन या कवितेबद्दलची आपली निरीक्षणे नोंदविली. 'आपण व्यक्ती म्हणून जसे आहोत तसेच आपण कवितेकडे पाहतो आणि तसेच आपण व्यक्त होतो. दासू वैद्य यांच्या कवितेत बुद्धी आणि प्रतिभा यांचा सुंदर वापर आहे. सर्व अवतरण चिन्हांच्या पलीकडे गेलेला हा कवी समकाळाशीच नाही तर वर्तमान आणि भूतकाळाशीही नाते ठेवत कविता लिहितो. कवीची बुद्धी आणि

प्रतिभा काळाच्या एका कंसात बांधता येत नाही; ती कालातीत असते. प्रत्येक कवी आपल्याला आकळलेला काळ कवितेत बांधतो. काळाकडे बघण्याची सजगदृष्टी या कवितेत आहे. चित्रमयता, दृश्यात्मकता असणारी ही कविता वाचकाशी सतत संवादी राहते', अशी कवितेची आणि दासू वैद्य यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये त्यांनी नोंदविली.

सोहळ्याचा समारोप बहारदार कविसंमेलनाने झाला. त्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवयित्री डॉ. अंजली कुलकर्णी होत्या. व्यक्तीपासून समष्टीकडे प्रवास करणाऱ्या, सजग भान असणाऱ्या एका कवी आणि कवितेचा हा सन्मान सोहळा भरगच्च रसिकांच्या उपस्थितीत संपन्न झाला. आजच्या दिशाहीन वर्तमानातील सकारात्मक वाटाव्या अशा अतिशय कमी घटनांपैकी ही एक महत्त्वाची घटना ठरावी.

— **प्रा. डॉ. समिता जाधव**

तथापि

दासू वैद्य



किंमत
₹. ३५०.००

येथे उपलब्ध

www.popularprakashan.com | amazon.in

Follow on us : @PopularPrakashn

सर्व विक्रेत्यांकडेही उपलब्ध!

एक हृद्य पत्र...

विद्यमान मुंबई पोलीस उपायुक्त गजानन राजमाने लिखित **खांद्यावरचे स्टार्स** हे पुस्तक मागील वर्षी पॉप्युलर प्रकाशनाद्वारे प्रसिद्ध झाले. राजमाने यांचे या अगोदरच्या त्यांच्या प्रशासकीय सेवेत जातीय तणाव असलेला परिसर ते नक्षलग्रस्त प्रदेश असे व्यापक कार्यक्षेत्र होते. तेथील अन्यायग्रस्त माणसे ते गुन्हेगार अशा सर्वच स्तरांतील समुदायाप्रती निभावलेल्या कर्तव्यांवर व स्वतःच्या कार्यानुभवावर आधारित गजानन राजमाने यांचे **खांद्यावरचे स्टार्स** हे पुस्तक अत्यंत प्रेरणादायी व सकारात्मक दृष्टिकोन देणारे आहे. या पुस्तकाला वाचकांचाही उदंड प्रतिसाद मिळाला. मागील वर्षभरात पुस्तकाच्या आठ हजार प्रतींच्या दोन आवृत्त्यांचा विक्रमी खप झाला.

या पुस्तकासंबंधी गजानन राजमाने यांचे बालपणीचे मित्र प्रा. अरुण कांबळे बनपुरीकर यांनी राजमाने यांना या पुस्तकाच्या निमित्ताने लिहिलेलं एक हृद्य पत्र खास 'प्रिय रसिक'च्या वाचकांकरिता...

प्रिय मित्र गजानन,

खरंतर हे अनौपचारिक पत्र तुझ्यातल्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यापेक्षा मित्र म्हणून असलेल्या प्रवासासाठी. तुझे 'खांद्यावरचे स्टार्स' हे पुस्तक सध्या सर्वत्र वाचनीय व प्रेरणीय बनलेले आहे, याचा मनस्वी अभिमान वाटतो. तू घडविलेल्या प्रत्येक कथेतल्या नायकाला उकलत असताना त्यांना माणुसकीची वाट दाखवण्यासाठी तू आणि तुझ्या टीमने उचललेल्या प्रत्येक धाडशी पावलांना मनोमन सलाम करावासा वाटतो. हा प्रवासच खरंतर खडतर; पण तुझ्या चाणाक्ष नेतृत्वगुणाने तो सुखकर झालेला. तुझं पुस्तक मार्केटमध्ये येण्यापूर्वी त्याचं मुखपृष्ठ मला शेअर करताना - "अरुण, आता मी तुझ्या साहित्यिक जातीतला झालो" - हा मेसेज मी मनाच्या स्क्रीनवरून अजूनही त्या स्क्रिनवर पाहतो. ९९ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात सातारा येथे पुस्तक विक्रीच्या स्टॉलवर - ***खांद्यावरचे स्टार्स*** *-*

बनलेली गर्दी डोळे भरून पाहताना उत्साहाने घेतलेली गळाभेटही – दोस्ता, काळजात जपून ठेवली आहे. तसा माझा आणि तुझा प्रवासच खडतर. तुझ्या आणि माझ्या वडिलांची कथा थोडीशी सारखीच. बनपुरीच्या एका आळीतला मी आणि दुसऱ्या आळीतला तू जरी असलो तरी आख्या बनपुरीच्या आळ्या-गल्ल्या-मळ्यात वावरलेलो आपण दोघेही.

लहानपणी भिमराव वस्ताद गावातल्या पोरांना पहाटे लवकर उठवून ओढ्याच्या वाळूत, गावदरीच्या ढेकळात कुस्त्या शिकवायचे. गावातली तालीम पुन्हा जिवंत होण्याचा तो सुदृढ काळ. मल्लखांबावरच्या कसरतीचा काळ. अजूनही डोळ्यांपुढून हलता हलत नाही. तू माझ्यापेक्षा तीन ते चार वर्षांहून लहान, पण खेळात चाणाक्ष व चपळ होतास. लहान असणारे आपण सर्वजण पहाटे पहाटे एकमेकांना उठवायला जायचो. ओढ्यात, रानात शड्डू ठोकायचो. तुझे वडील किश्ताक शिवायचे. ते किश्ताक घालून पैलवानकी

गाजवताना हुरूप संचारायचा. डिप्स, उठ्याबशा कुथून काढायचो. गावदरीची विहीर, धेंड्याची विहीर, जाधवाची विहीर मनसोक्त पोहण्याचे त्यावेळी स्विमिंग पूल वाटायचे. कराटे शिकायचा एक काळही त्यावेळी आकर्षणाचा बिंदू होता. डबलबार, सिंगलबार, कराटे, बॅक किक, साईड किक, जंप किक, नानचाकू याच्या मोहात पडलेलो आपण सगळेच. त्यात तू सगळ्या बाबीत तरबेज होतास. सांस्कृतिक चळवळीच्या प्रत्येक कलेचा आनंद आपण उपभोगलाय. खरंतर ही तुझी स्तुती नाही; पण बालपणाचा कष्टप्रद पण सुखाचा असणारा तो काळ खराखोटा करण्यासारखा नव्हताच. ते अस्सल जगणं होतं आपलं. हीच सुरुवात होती अंधारमय जीवन प्रकाशित करण्यासाठीच्या धडपडीची. कदाचित ती प्रेरणास्थळे असतील आपल्या बालपणीच्या प्रत्येक कृतीची. तुझं-माझं शैक्षणिक केंद्र खरंतर समांतर असलेलं आणि योगायोगाने ते एकच असलेलं होतं असं मला पुन्हा पुन्हा जाणवत राहतं. तुझी माझी

बनपुरी - खरसुंडी - सातारा - आटपाडी - कोल्हापूर ही या शैक्षणिक जडणघडणीची केंद्रे - म्हणजे तुला-मला घडवलेली समांतर केंद्रे - म्हणजे निवळ योगायोग. खरंतर बनपुरीच्या मातीत संस्कारीतपणे घडलेलं बालपणच तुझ्या खांद्यावरच्या स्टार्सचं चमकणं असावं. मनात धग, मनगटात रग व खांद्यावर जबाबदारी घेण्याची साहसी वृत्ती या मातीने तुझ्या अंगाखांद्यावर दिलीय हे अभिमानानं तुझ्याबद्दल सांगताना मला आकाश ठेंगणं झाल्यासारखं वाटतंय. तुझं पोलीस अधिकारी होऊन तरुणांना प्रेरणा देणारं काम मला तर प्रचंड भावलं आहे. तुझ्या सहकार्याने बनपुरीत सुरू असलेली सामाजिक, शैक्षणिक, वैचारिक क्रांतीची चळवळ प्रत्येक वर्षी गावातल्या तरुणामध्ये चार चाँद लावत असते. त्यात तू येणाऱ्या पिढीचा प्रेरणास्रोत बनून असतोस सर्वांपुढं. प्रत्येक वर्षी प्रशासकीय सेवेत नवीन भरती झालेल्या तरुणांना व नवीन बनलेल्या अधिकाऱ्यांना गावात बोलवून त्यांचा कौतुक

सोहळा गावासमोर करणं ही गावची वैचारिक व प्रेरणादायी दिवाळीच असते. या उजेडातूनच गावातली कितीतरी मुलं-मुली प्रशासकीय सेवेत भरती झालेली आहेत.. कित्येक त्या वाटेवर आहेत.. हे अभिमानाने सांगावेसे वाटते. शहिद विष्णू पुकळे स्मारक म्हणजे गावाचं अत्युच्च प्रेरणास्थळच आहे. या सर्वांचा तू साहेब नसून मित्र बनून राहतोस प्रत्येकाच्या मनामनांत. ही ऊर्मी, हा जोश तुला पाहिल्यानंतर सळसळत राहतो प्रत्येक नवयुवकाच्या मनात जिद्दीने नवे क्षितिज कवेत घेण्यासाठी.

आता तुझ्या पुस्तकाविषयी. खरंतर हे पुस्तक अंधारमय जीवन प्रकाशित करण्यासाठी अविरत जगण्याचं प्रेरणास्रोत बनलं आहे. तुझे ***खांद्यावरचे स्टार्स*** *पुस्तक वाचताना तू प्रत्येक पानावर उलगडत जातोस. ती ऊर्मी, ती धग, ती रग पानापानांत सळसळत राहते. फक्त कर्तव्य करायचे म्हणून नाही, तर माणुसकीचा धागाही जपायचा तुझा निर्धार पुस्तकातील प्रत्येकाच्या*

कहाणीत सकारात्मक जीवन जगायला भाग पाडतो. पोलीस सेवेतील अधिकाऱ्याची कर्तव्ये बजावत असताना सकारात्मक दृष्टीने घडवलेले परिवर्तन हा मुख्य गाभा या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे. आत्मसमर्पणाच्या वाटेवरचा दिलेर - क्रांतीची आस बाळगून वाट चुकलेला एक तरुण. क्षमा की शिक्षा अशी द्विधा अवस्था असताना त्याला अंधारातून प्रकाशात आणण्याची आनंददायी बनवलेली क्षमेची वाट तुझे स्टार्स चमकवणारी ठरलीय. एकेकाळचा मालेगावमधील क्रूर गुन्हेगार भवानीदादाला तुम्ही पैगंबरांचा दाखविलेला मार्ग वाखाणण्यासारखा आहे. “मैं गुनाह की राह, सब छोड़कर नेकीपर चलूंगा” असे म्हणणारा भवानीदादा ‘खुदा की कसम’ देऊन जातो, तेव्हा त्या त्या धर्मातील माणसांच्या मनांतील शोध घेत तो पूर्णत्वास घेऊन जाणे, यापेक्षा सर्वोच्च कामगिरी ती काय असू शकते असे वाटून जाते. पुढे भवानीदादा ‘पुलिस की दुँवा’ हा स्टार आयुष्यभर जोपासणारा नदीम

भाई बनतो हा क्षणच परस्मोच्च होऊन गेलाय. 'अजान आणि आरती'मधील धर्माची शिकवण आणि त्यातील प्रेमाचा विजय पुण्यकर्माचे प्रतीक बनला आहे. तळहाताचा पंजा नसलेला शाहीद 'धरती का तारा' बनून जातो. मॉलिवुड, मालेगावचा मुशायरा, ग्रीन मालेगाव ड्राईव्ह, सेल्फी फ्रॉम मालेगाव या सगळ्या कामांतून पोलिसांनी सामाजिक साहाय्याचे पोलिसींग करीत सर्वच समाजमनांना एकत्र बांधून ठेवण्याची उदाहरणे दुर्मीळ अशीच आहेत.

आपल्या मौल्यवान शरीराला मादक वस्तूंनी बरबाद करण्यापेक्षा अनेकांची आयुष्ये व्यसनाने बरबाद होण्यापासून वाचविण्याचे पुण्यकाम करताना तुझ्या वडिलांनी स्वतःमध्ये केलेला बदल आणि तू नानांना केलेला सॅल्युट यांचा रेशमी धागा बनलेल्या क्षणाला सलाम करावासा वाटतो. त्यांचे प्रेमाने भरलेले डोळे पाहून तुमची झोळी त्यांच्या दुवा-आशीर्वादाने भरल्याचे वाटणे हे मनाला खूप भावून नाते. तुझ्या होमगार्ड असणाऱ्या नानाला पोलीस

अधीक्षक असणारा तू पोलिसी युनिफॉर्ममध्ये सॅल्युट करतोस तेव्हा मलाही ऊर भरून त्यांना सॅल्युट करावासा वाटतो.

परमेश्वराने दिलेल्या खाकी वर्दीचा वापर नेक कामासाठी करणे हे शिवधनुष्य तुम्ही उचललं आहे याचा सार्थ अभिमानही वाटतो. कुंटणखान्यातील कमला नावाच्या आईच्या निकिता या मुलीला बारावीला ८२% मार्क पडलेले पाहून तिचे कौतुक करताना तिने हातावर ठेवलेला पेढा त्यांच्या कटू कहाणीला गोड करून जातो. आणि तिच्या आयपीएस बनण्याच्या जिद्दीला प्रकाशमय दीप लावण्याचे तुमच्या टिमचे कसब जनामनातली घरं प्रज्वलित होण्यासाठी स्वयंदीपाचे काम करतात. अविरतपणे पोलीस आपल्या खांद्यावर असणारी अभयदानाची जबाबदारी संभाळत असतात. आपल्या प्राणांची बाजी लावून अविरत अभयदान देणारे तुम्ही सर्वजण गौरवाची प्रतिके बनून स्टार्स चमकवत राहता, हे कार्य खूपच महान आहे.

साताऱ्याच्या अंध नामदासचे रक्तदानाचे पुण्यकाम 'इन्सानियत के लाल रंग' दाखवून जाते. 'शहादों ने बलिदान दिया, हम रक्तदान करेंगे' ही भावना देशप्रेमाच्या रंगात एकरूप होते. समाजाला खरी दृष्टी देणारा नामदास शरीराच्या धमन्यांतून जीवनोत्सव बनून वाहू लागतो. 'छाती पोलिसांची आणि हृदय शिक्षकांचे' बनून तुम्ही दिव्य कर्तव्ये पार पाडता तेव्हा ज्ञानाची ज्योत तुमच्या स्टार्सना लख्ख उजळवून टाकते. एका हातात प्राण आणि दुसऱ्या हातात रायफली घेऊन तुम्ही नक्षलवाद्यांच्या आयुष्याला माणुसकीचा दिलेला आधार तुमच्या टिमच्या निःस्वार्थी आणि निर्मळपणाचे उत्तम उदाहरण आहे आणि ते नागणडोहसारख्या गावात दिसते. आदिवासी संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी माणुसकीचा आधार देत शस्त्र नको पण सन्मानाचे वस्त्र देण्याचे काम तुम्ही प्रशासनाच्या मदतीने केले याचा मनस्वी अभिमान या प्रसंगातून वाटला. स्वपरिवर्तनातून विश्वपरिवर्तनाची कास धरणाऱ्या

मरकाम यांना मलाही विसरणे शक्य नाही. अजीम शेखच्या काळोखमय आयुष्यात ज्ञानाचा प्रकाश पाडून तू व तुझ्या टिमने दिव्य असे कर्तव्यच पार पाडले हे आणखी विशेष! फौजदार तयार करणारी फॅक्टरी, पिपरखारी गावावर नक्षलवाद्यांनी पेरलेली दहशत, बंदुकीशिवाय नक्षलबिमोड, कुपोषितांच्या आयुष्यातील लाल क्रांती, केशरी रंगाच्या साडीत कमळासारखी खुलून दिसणारी आजी, नशेत भरकटलेल्या मिनाक्षीच्या आयुष्यातून तिची नशा कायमची उद्ध्वस्त करण्यासाठी केलेला संगदोषावरील उपाय, विदर्भातील डॉनला चड्डीवर अनवाणी फिरविण्याची कामगिरी, लोकांना भयापासून मुक्ती देणारी खाकी वर्दीतली तुमची सेवा असे कितीतरी प्रसंग या पुस्तकातून प्रेरणा देत राहतात.

ज्यांच्याकडे मूर्त स्वरूपात 'स्टार्स' नसले तरी अशा हजारो-लाखो जणांचे स्टार प्रशासकीय कर्तव्याने चमकविण्याचे भाग्य तुम्हाला लाभले आहे. त्यामुळेच या पुस्तकातील २१ घटनांतील

प्रसंग वाचताना समाजातील व्यवस्थेसाठी सकारात्मक दृष्टीने तुम्ही तुमचे ‘खांद्यावरचे स्टार्स’ घेऊन केलेले काम आमच्याही मनात तुमच्या खांद्याला खांदा देऊन चमकविण्याची ऊर्मी निर्माण करते. आम्हालाही तुमच्या ‘खांद्यावरच्या स्टार्स’चा सार्थ अभिमान वाटत राहतो. तुमच्यातल्या या लोकसेवक स्टार्सना कडक सॅल्युट देण्यासाठी नकळत माझे कर कपाळाला स्पर्श करतात आणि गर्वाने माझ्या मातीतल्या तुझ्यासारख्या दोस्ताला उराउरी भेटताना छाती गगनाला भिडते. (हा लेख लिहीत असताना तुझी मुंबईच्या पोलीस उपायुक्तपदी बढती होणं हासुद्धा एक चमकणारा विलक्षण स्टारच आहे. मागच्याच आठवड्यात तुझे अभिनंदन करण्यासाठी फोर्स वनच्या कार्यालयात तुला भेटलो तेव्हा तू कडकडून मारलेली मिठी आणि फोर्स वनचा सगळा परिसर फिरवून दाखविलेला तो कर्तृत्वाचा आणि अभिमानाचा क्षण आणि गप्पांत रंगलेले चार तास विसरता येत नाहीत. तो क्षण सदैव

माझ्या काळजात कोरून ठेवला आहे. तू भेट दिलेल्या या पुस्तकाच्या पहिल्या पानावर तुझ्या हस्ताक्षरात माझ्यासाठी लिहिलेल्या ओळी खांद्यावरचे स्टार्स झाल्यासारख्या मलाही भासू लागल्या आहेत.)

*अल्पावधीत विक्रमी खपाचे ठरलेले तुझे हे पुस्तक प्रेरणा देणारे चिरंतन स्रोत बनले आहे. या पुस्तकातल्या सर्व प्रसंगांना आणि पुस्तकासाठी राबलेल्या सर्व हातांना मनोमन सलाम आहे. अंधारमय जीवन प्रकाशित करणारे तुझे **खांद्यावरचे स्टार्स** सदैव चिरंजीवी राहो. प्रशासकीय अधिकारी हा पूर्णतः तुझ्यासारखा समाजसेवक असायलाच हवा ही प्रेरणा तुझ्यामुळे सर्वांना मिळो. हे पुस्तक अनेकांचे दीपस्तंभ ठरो, या सदैव सदिच्छा आणि भरभरून मित्रप्रेम!*

तुझा मित्र

प्रा. अरुण कांबळे बनपुरीकर

सर्वसामान्य वाचकांचा प्रशासनावरचा
विश्वास वाढविणारे पुस्तक

खांद्यावरचे स्टार्स

गजानन शिवलिंग राजमाने



किंमत
₹. ३००.००

येथे उपलब्ध

www.popularprakashan.com | amazon.in

Follow on us : @PopularPrakashn

सर्व विक्रेत्यांकडेही उपलब्ध

दास्तान-ए-तुर्की

'पॉप्युलर प्रकाशन' हे मागील काही वर्षांपासून उत्तमोत्तम निवडक तुर्की साहित्याचा आणि त्यातही मुख्यत्वे तुर्की कादंबऱ्यांचा मराठी अनुवाद वाचकांकरिता घेऊन येत आहे. अशाच काही मराठी अनुवादित तुर्की कादंबऱ्यांच्या परिचयाची लेखमाला — 'दास्तान-ए-तुर्की' — आपण 'प्रिय रसिक'मध्ये सुरू केलेली आहे. या सर्व कांदबऱ्या विविध बाजाच्या, विषयाच्या, शैलीच्या आणि मुख्य म्हणजे वाचकांना खिळवून ठेवून खऱ्या अर्थाने वाचनानंद देणाऱ्या आहेत. या मालेतील सर्व कादंबऱ्यांचा परिचय प्रवीण कलंत्री हे एक रसिक-वाचक करून देत आहेत.

अहमद हमदी तानपिनार

मनःशांती

अनुवाद

सविता दामले

अहमद हमदी तानपिनार हे तुर्की कवी, कादंबरीकार, निबंधकार, इतिहासकार व राजकारणी आणि इस्तंबूल विद्यापीठात तुर्की साहित्याचे प्राध्यापकसुद्धा होते. आधुनिक तुर्की साहित्याची पायाभरणी करणाऱ्या लेखकांमध्ये त्यांचं नाव घेतलं जातं. या महान लेखकाचं कार्य हा तुर्की साहित्यातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. त्यांच्या अत्यंत गाजलेल्या 'हुज़ूर' या कादंबरीचा हा मराठी अनुवाद.

तुर्की साहित्यातील एक मैलाचा दगड मानली जाणारी ही कादंबरी आहे. पहिले महायुद्ध संपताना ऑटोमन साम्राज्याची फाळणी झाल्यानंतर नवनिर्मित तुर्कस्तानची राजकीय व सामाजिक जडणघडण होत होती. जुन्या संस्कृतीला पाश्चात्त्य संस्कृतीशी जुळवून घ्यावे लागत होते. नवीन तुर्की लॅटिन लिपी स्वीकारली जाऊ लागली होती. अशा परिवर्तनाच्या पार्श्वभूमीवर मुमताज या तरुणाची ही गोष्ट आहे.

एक तरुण इतिहासकार, लेखक बनण्याची स्वप्नं पाहणारा, संवेदनशील मनाचा मुमताज... त्याचे आई-वडील त्याच्या लहानपणीच गेले तेव्हा त्याच्या चुलत भावाने – इहसानने — त्याला मोठं केलं, शिकवलं. मुमताज त्याला वडिलांच्या ठिकाणी समजतो. इहसानची पत्नी मसिदेनेही त्याला जीव लावला होता. ती त्याची आई बनली, आणि मैत्रीणसुद्धा.

मुमताजपेक्षा दोन वर्षांनी मोठी, अत्यंत सुंदर, सुशिक्षित; परंतु घटस्फोटीत, एका मुलीची आई असलेली नुरान आणि मुमताज यांच्या प्रेम-प्रकरणाला सुरुवात होते. ते दोघे लग्नाचा विचार करताच पहिला विरोधाचा सूर उमटतो तो नुरानच्या मुलीचा. ती मुमताजला वडील समजायलाच तयार नसते. त्यांच्या प्रेमाला पाठिंबा देणारे कमी आणि विरोधक जास्त. अशा परिस्थितीत नुरान द्विधा मन:स्थितीत अडकते. नेमक्या त्याच वेळी सुआत पत्र लिहून नुरानवरचं प्रेम व्यक्त करतो.

मुमताजचा चुलत भाऊ असलेला सुआत विवाहित असून बाहेरख्यालीपणा करणारा, व्यसनी असतो. क्षयरोगाने मरणपंथाला लागूनही त्याला फक्त मुमताजला छळायच असतं. म्हणून मुमताजसाठीचे अत्यंत प्रिय आहे तेच हिसकावून घेण्याचा त्याचा प्रयत्न असतो. तो मुमताजला सुखी-समाधानी बघूच शकत नव्हता. अशा

विकृत मानसिकतेने पछाडलेला सुआत नेमका मुमताजच्या घरात आत्महत्या करतो. आणि नुरान मानसिकदृष्ट्या कोलमडून पडते.

या नंतर काय काय घडतं ते फार अंतर्मुख करणारं आहे. लेखकाने सगळ्याच पात्रांचं मानसशास्त्र इतक्या सखोलपणे मांडलं आहे की वाचक मुमताजच्या वेदनांशी एकरूप होतो.

मुमताज आणि सुआत यांच्या व्यक्तिमत्त्वातला विरोधाभास, मुमताज आणि नुरानचं एकमेकांविषयी असलेलं समर्पण, मुमताज आणि इहसानाच्या संबंधातील उत्कट माया, इहसानाच्या पत्नीने मसिदेने मुमताजवर केलेलं अपत्यवत प्रेम हे सगळं ठळकपणे येतं.

शिवाय कादंबरी वाचताना आपल्याला जाणवतं की, लेखक केवळ गोष्ट सांगत नाही तर तो त्या काळातील तुर्की समाजाची मानसिक स्थितीसुद्धा मांडत आहे. ऐतिहासिक संदर्भासह

तात्त्विक चर्चा यात आहे. काही प्रसंगी या चर्चेत लेखक गुंतून राहतो, त्यामुळे कथानकाचा वेगही मंदावतो. परंतु हे कथानक काहीसं गुंतागुंतीचं असून हरवलेल्या काळाचं आणि एका अपूर्ण राहिलेल्या प्रेमाच्या अस्वस्थतेचं चित्रण यात आहे.

ऑटोमन साम्राज्याच्या परंपरा आणि आधुनिक युरोपियन विचारधारा यांतील संघर्ष, जीवनाचा अर्थ आणि जगात शांती कशी प्रस्थापित होऊ शकेल यांविषयीची गहन तात्त्विक चर्चा करताना काही वेळेला शास्त्रीय संगीताच्या आधारे भावना मांडलेल्या आहेत.

मराठी अनुवाद सुलभ, प्रवाही आणि भावस्पर्शी झालेला आहे. मूळ कथानकातील दोन महायुद्धांच्या दरम्यान असलेल्या कालखंडातील सामाजिक, सांस्कृतिक भावना अत्यंत तरलतेने आलेल्या आहेत.

अहमत हमदी तानपिनार

म नः शां ती

अनुवाद
सविता दामले

पुस्तक खरेदीसाठी खाली दिलेला
QR Code स्कॅन करा.

www.popularprakashan.com

किंमत
₹.५५०.००



सर्व विक्रेत्यांकडेही उपलब्ध!

हे मासिक संपादक, मुद्रक, प्रकाशक हर्ष भटकळ यांनी पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि. यांचेकरिता
३०१, महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई ४०० ०२६ येथे प्रसिद्ध केले. संपादक : अस्मिता मोहिते.